**विनायक गणेश वझे महाविद्यालय,**
**मिठागर रोड, मुलूंड (पुर्व) - ८१**

२९/१०/२०१८

**नोटीस ( URGENT)**

इयत्ता १२ वी खाजगी विद्यार्थी ( अर्ज क.१७)

फेबुवारी २०१९

आर्टस,सायन्स आणि कॉमर्स

इयत्ता_१२ वी खाजगी विद्यार्थ्यांना कळविण्यांत येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेबुवारी २०१९ च्या परीक्षेसाठी प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांची नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrolment Certificate) कॉलेजमध्ये दि.३०/१०/२०१८ पर्यत जमा करावयाची आहेत. नावनोंदणी प्रमाणपत्र जे विद्यार्थी जमा करणार नाहीत त्या विद्यार्थ्यांना फेबुवारी २०१९ च्या परीक्षेसाठी बसता येणार नाहीत.

विद्यार्थ्यांना त्याचे नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrolment Certificate) SMS व्दारे अथवा E-Mail व्दारे मंडळाकडून प्राप्त झालेले असेल त्यांच्या २ झेरॉक्सप्रती कॉलेजमध्ये Counter No-६ वर जमा करावयाचे आहेत.

ज्या विद्यार्थ्यांना नावनोंदणीप्रमाणपत्र SMS व्दारे अथवा E-Mail व्दारे मंडळाकडून प्राप्त झालेले नसेल त्यांनी अधिक माहितीकरीता http://form १७.mh-hsc.ac.in या संकेत स्थळाचा वापर करावा.

उपप्राचार्य.
VICE PRINCIPAL
Junior College
V.G. Vaze College,
Mulund (E), MUMBAI-400 081.

K.E.T.'S. VAZE COLLEGE 1984

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## ॥ प्र क ट न ॥

**विषय- फेब्रुवारी-मार्च २०१९ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी ) परीक्षेसाठी खाजगीरित्या (Private Candidate) प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नाव नोंदणी (Enrolment Certificate) प्रमाणपत्राबाबत व सदर विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करण्याच्या तारखांबाबत...**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेमार्फत फेब्रुवारी-मार्च २०१९ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेसाठी खाजगीरित्या (Private Candidate) प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी प्रमाणपत्रासाठी (Enrolment Certificate) नियमित शुल्कासह ऑनलाईन अर्ज दिनांक ०३/१०/२०१८ पर्यंत सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने **जे विद्यार्थी नाव नोंदणी प्रमाणपत्र मिळण्यास पात्र ठरलेले आहेत अशा विद्यार्थ्यांना त्यांची नाव नोंदणी प्रमाणपत्रे (Enrolment Certificate) दिनांक २७/१०/२०१८ पासून विद्यार्थ्यांना त्यांच्या भ्रमणध्वनीवर व ईमेलवर संदेश (SMS) उपलब्ध होतील. अशा विद्यार्थ्यांनी आपले स्वतःचे नावनोंदणी प्रमाणपत्र http://form 17.mh-hsc.ac.in या संकेत स्थळावरुन दिनांक २७/१०/२०१८ पासून उपलब्ध करुन घ्यावीत.**

तसेच सदर नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थ्यांची फेब्रुवारी-मार्च २०१९ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने **www.mahahsscboard.maharashtra.gov.in** किंवा **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| शुल्क प्रकार | खाजगी विद्यार्थ्यांची ऑनलाईन पध्दतीने परीक्षेची आवेदनपत्रे उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत भरावयाच्या तारखा | खाजगी विद्यार्थी परीक्षा आवेदनपत्रांचे शुल्क उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी बँकेत चलनाद्वारे भरावयाच्या तारखा |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| नियमित शुल्कासह | शनिवार दिनांक २७/१०/२०१८ ते मंगळवार दिनांक ०६/११/२०१८ | सोमवार दिनांक १२/११/२०१८ ते शनिवार दिनांक १७/११/२०१८ |
| विलंब शुल्कासह | बुधवार दिनांक ०७/११/२०१८ ते रविवार दिनांक ११/११/२०१८ | |

अ) उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाची तारीख = सोमवार दिनांक १९/११/२०१८

ब) दिनांक ०७/११/२०१८ ते १२/११/२०१८ या कालावधीत उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या याद्या Excel मध्ये प्रिंटींग करणे.

१. परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत भरावी.
२. सर्व विभागीय मंडळातील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रचलित शुल्क मंडळाने निश्चित केलेल्या बँकेच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच संबंधित विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.
३. खाजगी विद्यार्थ्यांचे नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाव्दारेच भरण्यात यावे.

(डॉ. अशोक भोसले)
सचिव
राज्यमंडळ, पुणे-०४

दिनांक- २६/१०/२०१८